## इथे कोणता शिक्का चालतो ?

वाल्मीकी ऋषींनी शतकोटी रामायण रचले. ही रचना इतकी सुंदर झाली, की देव, दानव आणि मानव यांच्यामध्ये भांडण सुरू झाले ते आपल्यालाच मिळावे यासाठी. शेवटी निवाडा करण्यासाठी सर्वजण कैलासावर शिवशंकरांकडे गेले. त्यांनी ते तिघांमध्ये वाटून देण्याचे ठरविले. प्रत्येकाला तेहतीस कोटी असे दिल्यावर एक कोटी शिल्लक उरले. मग प्रत्येकी तेहतीस लाख असे करता करता तिघांच्या वाट्याला तेहतीस कोटी तेहतीस लक्ष तेहतीस हजार तीनशे तेहतीस इतके श्लोक आले. परत एक श्लोक शिल्लक उरलाच.

रामायणाचा श्लोक अनुष्टुभ छंदाचा. त्यातल्या चार चरणांत मिळून बत्तीस अक्षरे. त्यातली परत दहा-दहा अशी तिघांना दिल्यावर दोन अक्षरे उरली. ती दोन अक्षरे मात्र महादेवांनी स्वतःसाठी ठेवून घेतली. आता कोटींनी प्राप्ती झाल्यावर याला कोणीच हरकत घेतली नाही. पण ती दोन अक्षरे होती 'राम'.

वाटणी करता करता शिवशंकरांच्या ध्यानात रामायणाचे सार आपोआपच आले. ते त्यांच्या जवळच राहून गेले. हक्काचा वाटा मिळवण्यासाठी भांडणारे इतर मुद्यांवर भांडायला मोकळे झाले. भांडण टळणारे नव्हतेच. कारण आपला मुद्दा सोडून इतरांच्या मुद्द्यांचाच नव्हे; तर इतरांचासुद्धा विचार करायला कोणी तयार नव्हते.

शैव आणि वैष्णवांच्या झगड्यात एका संताने उद्‌गार काढले, ''अरे जरा खोल विचार तर करून बघा. तुम्हाला कळेल, की भगवान शिव विष्णूच्या नावाचा सतत जप करीत आहेत; तर भगवान विष्णूंच्या मुखातून सारखे शिवाचेच मंगल नाम उच्चारले जाते आहे. दोघेही एकमेकांच्या हृदयात प्रतिष्ठित झालेले आहेत. असे का हे समजून न घेता त्यांचे भक्त मात्र आपसांत भांडणच करीत आहेत.''

सात आंधळे आणि हत्ती या गोष्टीतल्या आंधळ्याप्रमाणे प्रत्येक जण हत्तीला खांबासारखा, सुपासारखा, भिंतीसारखा असं काही तरी ठरवून मोकळा होऊन जातो. ज्याला संपूर्ण हत्ती दिसत असतो त्याला हा प्रकार हास्यास्पदच वाटणार. ज्या रंगाचा चष्मा चढवून जगाकडे, घटनांकडे पाहू त्याच रंगाचे सारे दिसणार. इतके सुंदर रंग, त्यांच्या एकमेकांत मिसळून आणखी सुंदर अशा रंगच्छटा ईश्वराने निर्माण केल्या आहेत. त्यांचे सौंदर्य आपण कसे अनुभवू शकणार ?

ते चष्म्याचं ढापण डोळ्यांवरून काढल्यावरच इतर रंग वास्तवाचं खरं सौंदर्य प्रकट करतात.

पतंजली मुनींनी योगदर्शनात ऋतंभरा प्रज्ञा सांगितली आहे. ही मिळविण्यासाठी 'यथा अभिमत ध्यान' हा देखील एक मार्ग सांगितला आहे. या प्रज्ञेने डोळस होऊन जगाकडे पाहिलं की निखळ वास्तव सत्य समोर यायला लागतं. मग नुसतं वास्तवच नव्हे; तर ते तसे का आहे याचं कारण म्हणजे ऋत सुद्धा जाणवायला लागतं. मग आता काय आहे, काय घडतं आहे, इतकंच नव्हे; तर काय घडणार आहे त्याचं सुद्धा ज्ञान होतं. पण आपल्याला ध्यानाला फुरसदच कोठे आहे ? सत्याचं आकलन करण्याऐवजी वस्तूंवर आणि घटनांवर आपल्या मताचा शिक्का मारून पुढे जायला आपण अधीर झालेले असतो. पण असं करण्याने आपला शिक्का आपण सोडून इतर कोणाकडेच चालणार नाही, हे समजतच नाही.

**– भीष्मराज बाम**

**('मना सज्जना' या पुस्तकातून)**